Impact Factor-8.575 (SJIF)

ISSN-2278-9308

# B.Aadhar


## Single Blind Peer-Reviewed & Refreed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

January-2023

(CCCLXXXVI ) 386 ©

## 75th YEARS OF INDIAN INDEPENDENCE




**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor**
Dr. Vilas Aghav
Officiating Principal
Associate Professor & Head
Department of Political Science.
Adarsh Mahavidyalaya, Hingoli Dist. Hingoli

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

Aadhar Publications

Impact Factor-8.575 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Single Blind Peer-Reviewed & Refreed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

**January-2023**

(CCCLXXXVI ) 386 ( C )

## 75th YEARS OF INDIAN INDEPENDENCE




**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
**Director**
**Aadhar Social**
**Research & Development**
**Training Institute Amravati**

**Editor**
**Dr. Vilas Aghav**
Officiating Principal
**Associate Professor & Head**
**Department of Political Science.**
**Adarsh Mahavidyalaya, Hingoli Dist. Hingoli**

**This Journal is indexed in :**

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

# Aadhar International Publication

**For Details Visit To : www.aadharsocial.com**

| | | |
|---|---|---|
| 23 | मानवी हक्क आणि भारतीय राज्यघटना यांच्यातील आंतरसंबंध<br>डॉ.शैला भगवान सारंग | 88 |
| 24 | मानवी हक्क आणि भारतीय राज्य घटना<br>जगताप शुभांगी जगदीश | 95 |
| 25 | भारतीय संविधान आणि मानवी हक्क घटनासमितीची ऐतिहासिक पार्श्वभूमी<br>प्रा.डॉ.संतोष गोपाळकृष्ण कुळकर्णी | 99 |
| 26 | भारतीय लोकशाही समोरील आव्हाने<br>प्रा. डॉ. आर. जी. सुरळकर | 103 |
| 27 | भारतीय राज्यघटना आणि मानवी हक्क<br>डॉ.अंकुश अंबादास चव्हाण | 107 |
| 28 | भारतीय लोकशाही व्यवस्थेतील निवडणूक आयोगाची भूमिका<br>डॉ. ममता विजयराव पाथ्रीकर | 109 |
| 29 | निवडणूक आयोगाची भूमिका<br>प्रा. डॉ. विजयकुमार सोन्नर | 115 |
| 30 | आंतरराष्ट्रीय राजकारणातील भारताची भूमिका<br>प्रा. डॉ. परमेश्वर मुंडे | 121 |
| 31 | मुलभूत हक्क आणि कर्तव्य<br>डॉ. शिंदे सुरेखा सदाशिवराव | 129 |
| 32 | संत बहिणाबाई - एक आकलन<br>डॉ. अंशुमती रा. काहाणे | 137 |
| 33 | मानवी हक्क आणि भारतीय राज्यघटना<br>प्रा. समाधान नारायण दराडे | 142 |

B.Aadhar' Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.575, Issue NO, (CCCLXXXVI) 386- C
ISSN : 2278-9308
January, 2023

# संत बहिणाबाई - एक आकलन

**डॉ. अंशुमती रा. काहाणे**
(मराठी विभाग प्रमुख) श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती - ४४४७०५
भ्रमणध्वनी क्र. ९४०४१०९२८०/ ९४२३६०९३९६

**प्रास्तविक :-**

मध्ययुगीन महाराष्ट्रात होऊन गेलेल्या संत कवयित्रींनी रचलेले अभंग अथवा भक्तीरसाने भरलेले काव्य, ओव्या यांमधून तत्कालीन स्त्री-जीवनाविषयीचे उल्लेख आढळून येतात. तत्कालीन भारतीय समाजजीवन जे संत कवयित्रींनी अनुभवले, जे त्यांना जाणवले, ते त्यांनी काव्याच्या माध्यमाद्वारे रचून चित्रित केले व अंत:करणाला खोलवर स्पर्श करणाऱ्या त्यांच्या साहित्यामधून ते प्रगट झालेले दिसून येते. मध्यमयुगीन महाराष्ट्रात होऊन गेलेल्या महदंबा, संत मुक्ताबाई, संत जनाबाई, गोणाई व राजाई, कान्होपात्रा, संत बहिणाबाई इत्यादी संत कवयित्रींनी त्यांच्या काव्यामधून समाजजीवनाच्या व स्त्री-जीवनाच्या वेगवेगळ्या अंगावर प्रकाश टाकल्याचे दिसून येते.

मध्ययुगीन काळातील महाराष्ट्रात संत कवयित्रींची एक परंपराच होऊन गेलेली दिसून येते. त्यांनी जी काव्यरचना केली, त्यातून मानवी जीवनाची मूल्ये आणि स्त्री-जीवनाच्या विविध पैलूंचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. त्यांच्या काव्याचा अभ्यास केल्यानंतर त्यांच्या काव्यांमधून स्त्री-जीवनाचे अनुभव व स्त्रियांच्या दु:खमय जीवनाचे चित्रण केलेले आढळून येते. त्यांनी आपल्या साहित्यातून समाजातील अनिष्ठ परंपरा व पध्दतींवर टीका करुन त्यांचा नायनाट होण्याच्या दृष्टिकोनातून समाजाला बोधप्रद मार्गदर्शन केले. त्यावरुन त्यांची भूमिका समाजहितांची व समाजाला शिक्षित करणाऱ्या समाज शिक्षकांसारखी होती असे प्रत्ययाला येते.

महाराष्ट्रात होऊन गेलेल्या महदंबा, मुक्ताबाई, संत जनाबाई, कान्होपात्रा, बहिणाबाई इत्यादी संत कवयित्रींच्या कार्याचे विशेष महत्व लक्षात घेतले पाहिजे. जेव्हा मध्यमयुगीन कालखंडात महाराष्ट्रातील समाजजीवनात स्त्रीला अतिशय दुय्यम स्थान दिलेले होते, तिला शिक्षण घेणे अशक्य होते, तिच्यावर धर्माची अनंत बंधने लादलेले असत, तिला समाजात शूद्रासारखा कनिष्ठ दर्जा मिळालेला होता. स्त्रियांना मानसन्मान किंवा स्वातंत्र्य, प्रतिष्ठा ठाऊक नव्हते. सामान्य स्त्रियांना हिनपणाची वागणूक मिळत होती. अशा परिस्थितीत वरील संत कवयित्रींनी स्वत:च्या प्रतिभाशक्तीच्या बळावर आणि स्वकर्तृत्वाच्या जोरावर काव्य व अभंगाची निर्मिती केली आणि साहित्यक्षेत्राला मोठे योगदान दिले. समाजजीवनातील दृष्टांत व उपमा यांचा वापर करुन आध्यात्म ज्ञानाला समाजाभिमुखी बनवितांना समाजातील अनुभवांची अथवा व्यावहारिक ज्ञानाची त्यास जोड दिलेली दिसून येते.

महाराष्ट्रात संत कवयित्रींना आध्यात्म क्षेत्रातील प्रेरणा संतापासून मिळालेली दिसते. महदंबा या संत कवयित्रीला चक्रधरांनी प्रेरणा दिली होती. चक्रधरांची ती शिष्या होती. गोविंदप्रभुच्या सहवासात तिने जीवन कंठिले होते. संत मुक्ताबाईला संत निवृत्तीनाथ व ज्ञानेश्वर यांची प्रेरणा, तर संत जनाबाईला नामदेवाचा आणि बहिणाबाईला संत तुकारामाचा सहवास लाभलेला होता. संतांचे सानिध्य व सहवासातच वरील संत कवयित्री राहिल्या व वाढल्या होत्या. त्यामुळेच या कवयित्रींचे काव्य आणि अभंग मोठे प्रभावी ठरले आहेत.

संत कवियित्रींनी आपल्या काव्यातून आध्यात्मासारखा विषय हाताळलेला आहे. परंतु आध्यात्मिक विषय अधिक सोप्या पध्दतीने सांगण्यासाठी त्यांनी प्रचलित समाजजीवनातील रुपके, दृष्टांत वापरले आहेत. त्यावरुन संत कवयित्रींचा समाजाचा व काव्याचा किती निकटचा संबंध असतो हे स्वउदाहरणाने दाखवून दिले आहे. या संत कवयित्रींनी रचलेले अभंग निश्चितच स्त्री-जीवनातील अनुभवांना स्पर्श करणारे आहेत. त्यांनी तत्कालीन महाराष्ट्रात प्रचलित असलेल्या अनिष्ट पध्दती व आचार-विचार, अनीतीची कृत्ये, निष्ठा आणि श्रध्दा, इत्यादींचा उल्लेख त्याच्या साहित्यातून केलेला दिसून येतो. म्हणूनच त्यांच्या साहित्याद्वारे त्या संत कवयित्रींनी तत्कालीन समाज, संस्कृती व स्त्री-जीवनाच्या विविध पैलूंचे दर्शन घडविलेले आहे. संताच्याच प्रेरणेने संत कवयित्रींनी आध्यात्म मार्ग स्वीकारला आणि कान्होपात्रा सारख्या स्त्रीला आत्मविकासाचा मार्ग खुला झाला. मध्यमयुगीन काळातील धार्मिक बंधनांनी जखडलेल्या सामान्य स्त्री-जीवनाच्या पार्श्वभूमीवर या संत कवयित्रींचे आध्यात्मिक व साहित्य क्षेत्रातील योगदान मोठे नैत्रदीपक मानले जाते. संत कवयित्रींनी तत्कालीन प्रतिकूल सामाजिक जीवनाचा अनुभव घेत आध्यात्ममार्गाच्या अवलंबाद्वारे समाजातील सामान्यवर्गाच्या स्त्रियांना आत्मोन्नतीच्या व जीवन विकासाच्या मार्गाची प्रचिती आणून दिली. भक्तीसारख्या साहित्य निर्मितीमुळे आणि आध्यात्मिक ज्ञान क्षेत्रातली स्वकर्तृत्वाने प्राप्त केलेल्या अधिकारामुळे त्या कवयित्रींनी सामाजिक प्रतिष्ठा मिळविली. परंतु त्यापेक्षा सामान्य स्त्रियांकरीता त्यांनी आत्मविकासाच्या बळासाठी व आत्मौन्नतीच्या मार्गासाठी आवश्यक असलेले परमेश्ववरील प्रेम, अतुट निष्ठा व मानवतेची दृष्टी इत्यादी शाश्वत जीवनमूल्येही दर्शविली. ही शाश्वत जीवनमूल्ये समाजहितासाठी

आवश्यक आहेत. संत कवयित्रींनी दर्शविलेल्या आत्मोन्नतीच्या आणि आत्मविकासाच्या मार्गाचा ठसाच समाजात सदैव आणि चिरकाल टिकणारा आहे.

मध्यमयुगीन महाराष्ट्रात महदंबापासून बहिणाबाईपर्यंत होऊन गेलेल्या संत कवयित्रींचे स्वरचित काव्य म्हणजे तत्कालीन समाजातील स्त्री-जीवनाचा आरसाच म्हटला पाहिजे, त्यांच्या काव्यामधून तत्कालीन स्त्री-जीवनाच्या विविध पैलूंचे चित्रण साकार झालेले आहे. काही कवयित्री सामान्य कुटुंबातील व समाजात कनिष्ठ दर्जा असलेल्या हीन वर्गाच्या स्त्रिया होत्या. त्यांनी समाजात जे दुःखदायक व क्लेशकारक जीवन अनुभवले, त्या अनुभूतींवर आधारलेल्या स्त्री-जीवनाचे प्रतिबिंब त्यांच्या भक्ती काव्यामधून उमटलेले दिसून येते. त्या कवयित्रींचे साहित्य मध्यमयुगीन स्त्री-जीवनाचा इतिहास अभ्यासण्याचे एक महत्वाचे व प्रभावी साधन म्हणावे लागेल. संत कवयित्रींनी रचलेल्या काव्याआधारे व त्यांच्या स्वकर्तुत्वाने त्यांनी तत्कालीन समाजात स्वतंत्र स्थान निर्माण केले होते. या घटकात ज्या संत कवयित्रींया कार्याचा अभ्यास केला त्यांना संताची प्रेरणा मिळाली होती. त्यांच्या काव्याच्या अभ्यासाद्वारे त्यांचे ईश्वरावरील प्रेम, भक्ती व निष्ठा इत्यादी गुण लक्षात येतात.

**संत बहिणाबाई :-**

एक थोर मराठी स्त्री संत व कवी. संत मालिकेतील अग्रेसर मुक्ताबाई, कान्होपात्रा, जनाबाई, वेणाबाई, आक्काबाई, मीराबाई यासह बहिणाबाईचे स्थान मानावे लागेल.

बहिणाबाईचा जन्म, गोदावरीच्या उत्तरेस घृष्णेश्वराच्या पश्चिमेस, वैजापूर तालुक्यातील देवगांव (रंगाऱ्याचे) येथे शके १५५१ मध्ये ब्राह्मण कुटुंबात झाला. तिच्या आईचे नाव जानकी व पित्याचे नाव आऊजी. माता पित्यांनी तिचा विवाह वयाच्या पाचव्या वर्षी त्याच गावातील पाठक कुटुंबात लावला.

संत बहिणाबाईना लहानपणापासून परमार्थाची व भक्तीची ओढ होती. कथा-किर्तने, पुराण-श्रवण आणि सत्पुरुषांची सेवा यात संत बहिणाबाई रमली होती. पण तिची संसारावरील आसक्ती कमी होवून परमार्थीक वृत्ती वाढत गेली. घरची गरीबी, शिक्षणाचा अभाव, तरीही समाधानी वृत्ती व संतवृत्तीला साजेशी पांडुरंगाची ओढ मनात होतीच. अखंड नामस्मरण चालू असे, शेतात काम करित असतांनाही हा भक्तीभाव अभंगाचे रुपाने तिच्या मुखातून बाहेर पडे.

पूढे कोल्हापूर वास्तव्यात जयराम स्वामीच्या कथा कीर्तनात संत बहिणाबाईच्या मनावर प्रभाव पडला. ती रोज तुकोबाचे अभंग म्हणू लागली व तुकोबाचे दर्शनाचा ध्यास घेतला. तिला तुकोबारायाना सदगुरु करुन त्यांचे अनुग्रह व आशिर्वाद घ्यावयाचा होता. म्हणून रात्रंदिवस तुकोबाचे अभंग म्हणत त्याचे ध्यान करु लागली. शेवटी कार्तिक व. ५ शके १५६९ रोजी तुकोबारायांनी स्वप्नात येवून गुरुपदेश दिला. बहिणाबाईंचे सारे जीवन गुरुबोधामुळे बदलून गेले. तिने आपले गुरु संत तुकाराम महाराज व त्यांचीहि गुरुपरंपरा आपल्या अभंगात वर्णन केली आहे.

त्यांचे वर्णन करतांना गेल्या शतकातील एक श्रेष्ठ संत, संतचरित्रकार आणि श्री गजानन विजयकर्ते संत कवी दासगणू महाराज लिहितात, पहा केवढा अधिकार.... ऋणि तिचा परमेश्वर या साध्वींची समाधी शेऊर या गावी आहे.

या साध्वीच्या चरित्रातील एक प्रसंग ज्ञात आहे तो असा, नेमाप्रमाणे एकादशीच्या वारीकरीता पंढरीला निघालेल्या असतांना त्यांना अचानक थंडी वाजून ताप भरला. परंतु पांडुरंगाच्या भेटीची केवढी तळमळ, की त्यांनी अंगावरच्या फाटक्या घोंगडीला विनंती केली, 'ही माझी हुडहुडी तात्पुरती तुझ्याजवळ ठेव, एवढी वारी करुन येईन, आणि मग माझा भोग भोगिन' ही घोगडी त्यांनी एका झाडावर ठेवली व त्या वारीस निघून गेल्या. त्या सुखरुप परत येईपर्यंत ते झाड हीव भरल्यामुळे थड्थड हालत होते.

संत बहिणाबाई यांनी सुमारे ४७३ अभंगाची रचना केली आहे.
ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासे कळस | या प्रसिध्द अभंगाची रचना साध्वी बहिणाबाई यांचीच,
संत कृपा झाली इमारत फळा आली |
ज्ञानदेवे रचिला पाया उभारिले देवालया |
नामा तयाचा किन्कर तेणे विस्तारिले आवार |
जनी जनार्दन एकनाथ स्तंभ दिला भागवत
तुका झालेसे कळस, भजन करा सावकाश |
बहिणा फडकली ध्वजा तेणे रुपकले ओजा |

वहिणाबाईचे पाचशेहून अधिक अभंग उपलब्ध आहेत. त्या अभंगातून बहिणाबाईने तिचे आत्मचरित्र वर्णिलेले दिसून येते. बहिणाबाई ही संत तुकारामाची शिष्या बनली होती. त्यामुळेच तिच्या अभंगामधून सत तुकारामाचे वर्णन आढळून येते. तिच्या अभंगातून तिने तेरा जन्म घेतल्याचे सांगून त्या जीवनातील प्रसंगाचे वर्णन अभंगामधून पाहावयास मिळते. या संत कवयित्रींच्या काव्यामधून तत्कालीन समाज पध्दतीचे, रितीरिवाजाचे आकलन होते. त्याकाळात मुलीच्या बालपणी तिचा विवाह बिजवराशी लावला जाई. त्यानंतर तिच्यावर वैधव्य जीवनाचा प्रसंग गुदरत असे. विधवा स्त्रीच्या दुःखमय जीवनाच्या भावनाचे चित्रीकरण कवयित्रीने तिच्या ओव्यामधून केलेले दिसून येते. बहिणानाबाईंच्या अभंगातून तत्कालीन भारतीय समाजजीवनाच्या विविध पैलूंचे

वर्णन आढळते. बहिणाबाईंच्या मनावर तत्कालीन धार्मिक विचारांचा प्रभाव पडलेला होता. त्यामुळे आदर्श पतिव्रतेचे प्रतिनिधीक स्वरुपाचे जीवनाचे प्रतिबिंब तीने रचलेल्या ओव्यांमधून उमटलेले दिसून येते. त्याकाळी भारतीय समाजात पतिव्रतेबाबत ज्या कल्पना होत्या त्या कल्पना तिच्या अभंगातून स्पष्ट झालेल्या दिसतात. आपल्या काव्यातून बहिणाबाईने संताचा महिमा सांगणारे वर्णनही केलेले आहे. तिच्या अभंगामधून आध्यात्मिक ज्ञान, भक्ती आणि कर्म यांचे विवेचनही कवयित्रींनी साकारलेले आहे.

बहिणाबाईने तिच्या अभंगाच्या रचनेतून ईश्वरावरील परमनिष्ठा, आत्मसाक्षत्कार इत्यादीमुळे भक्ताच्या मनोविकासाची उन्नत व्यवस्था कशी गाठता येते याचे विवेचन केले आहे. बहिणाबाईंच्या उदाहरणावरुन समाजासमोर त्या कवयित्रीने जो आदर्श ठेवला आहे तो म्हणजे संसारात राहूनही विवेकाच्या मार्गाने जीवन समतोल ठेवून स्त्रीला आध्यात्माद्वारे मोक्ष प्राप्ती मिळविता येते. तो मोक्षप्राप्तीचा ठेवा जीवनातील सुखाचा परमोच्च बिंदू म्हटला पाहिजे. मराठी मानसांच्या व स्त्रियांच्या मनपटलावर बहिणाबाई या कवयित्रीने आत्मसाक्षत्कारने उमटविलेला अभंग काव्याचा ठसा आजही घरोघरी अनुभवास येतो.

संत कवयित्री महदंबा, मुक्ताबाई, जनाबाई, कान्होपात्रा आणि बहिणाबाई ईत्यांदीनी मराठी साहित्याला आणि स्त्री-जीवनाच्या विकासाला मोठे योगदान दिले आहे. या संत स्त्रियांनी अभंग, ओव्या रचून भक्तीसंप्रदयाच्या साहित्यात मोठी मोलाची भर घातली. शिवाय या संत कवयित्रींनी शुध्द आचरणाचा आदर्श समाजासमोर निर्माण केला. आणि समाजातील असंख्य स्त्रियांना आशावादी जीवन जगण्याची शिकवण दिली. त्यांनी धैर्य व बुध्दीमत्तेची चुणूक दाखवून स्त्रियांना आणि मानवजातीला मानवी मनातील अहंकाराचा त्याग करावयाचा धडा दिला. संत जनाबाई ही तर क्रांतीकारी कवयित्री म्हणून ओळखली जाते. शुद्र दासी म्हणून जीवन जगलेल्या संत जनाबाईने भारतीय स्त्रियांना स्वकर्तृत्वाने आत्मोन्नती करण्यासाठी आध्यात्मवादाचा मार्ग स्त्रियांनी अवलंबविण्याविषयीचा आदर्श घालून दिला. संत कवयित्रीने स्वकर्तृत्वाच्या बळावर आत्मविकासाचा मार्ग कसा साधता येतो व आध्यात्माच्या मार्गाने संसारात राहून मोक्षप्राप्त मिळवून आत्मोन्नती कशी साधता येते याची शिकवण स्त्रीवर्गाला दिली. समाजात कनिष्ठ शुद्राचा दर्जा असलेल्या स्त्रियांना आत्मोन्नतीसाठी व आत्मविकासासाठी धैर्य, विनम्रता, शुध्द चारित्र्य इत्यादी गुणांची गरज असते हे त्यांनी त्यांच्या स्वतःच्या उदाहरणावरुन समाजाच्या निदर्शनास आणून दिले.

बहिणाबाईचे विधुराशी लग्न झाल्यामुळे तिची प्रपंचासंबंधी आसक्ती मावळली आणि आपल्या दृढ निश्चयाने ती संतत्वाच्या दिशेने झपाट्याने वाटचाल करु शकली. एका दृष्टिने बहिणाबाई तरुणपणातच संत म्हणून प्रसिध्द पावली. त्यामुळे तिच्या वैवाहिक जीवनात सतत विक्षेप येत राहीले. तिच्या लग्नासाठी काढलेले कर्ज आईवडिलांना फेडता आले नाही म्हणून एका रात्रीच आई, वडिल, लहान भाऊ व पती गाव सोडून निघाले.

तीर्थाटन करीत रहिमतपूर या सातार्‍या जवळच्या गावी आले. दोन वर्षे तेथे राहून कोल्हापूरला आले. बहिरभट नावाच्या ब्राह्मणाच्या घरी राहू लागले. तिथे रोज भागवत पुराण व वेदाभ्यास बहिणाबाईंच्या कानी पडू लागला. या वेळीच योगायोगाने ऐका भाविकाने बहिरभटांना सवत्स गाय दान दिली. त्याने ती गाय, स्वप्नात दृष्टांत झाल्यामुळे बहिणाबाईच्या नवर्‍याला दान केली.

सुवर्णाची शिंगे | रुपियाचे खूर | वरी पितांबर पांघुरिला ||

अशा गायवासराचा लळा बहिणाबाईला लागला. ते वासरु गायीपेक्षा बहिणाबाई जवळच जास्त काळ राहत असे. ती कथा-कीर्तनाला गेली तरी ते तिच्या जवळच उभे राहत असे. हे सर्व तिच्या नवर्‍याला अजिबात आवडत नसे. एके दिवशी बहिणाबाई संत श्री जयरामस्वामी वडगांवकर यांच्या कीर्तनाला गेली असता तिला यायला मध्यरात्र झाल्या मुळे तीचा नवरा गंगाधराला राग आला व त्यामुळे तिला मारहाण करुन हातपाय बांधून गाय-वासरा समोर टाकून दिले. तिची ही अवस्था पाहून गाय-वासरांनाही दुःख झाले आणि त्यांनी चारपाणी घेणे बंद केले व त्यानंतर तीन दिवसांनी बहिणाबाईच्या अंगावर मान टाकली आणि प्राण सोडला. बहिणाबाई सुध्दा या प्रकाराने तीन दिवस बेशुध्द होती. चौथ्या दिवशी एका ब्राह्मणाने तिला दृष्टांत देवून सावध केले. वासरु गेल्यामुळे वेडीपीशी झालेल्या बहिणाबाईला हरीकथा आणि पंढरपुरात ऐकलेले तुकारामाचे अभंग आठवू लागले. तिच्या जीवाला तुकाराम दर्शनाची ओढ लागली.

तुकोबाची पदे अद्वैत प्रसिध्दे |
तयाच्या अनुवादे चित्त झुरे ||
ऐसी ज्याची पदे तो मज भेटता |
जीवास या होता तोष बहू ||

असे बहिणाबाईस वारंवार वाटू लागले. वेदाचा अर्थ मराठीत आणणारा तुकोबा सहोदर भासू लागला. त्यासाठी हे कुटुंब देहू ला निघाले पण तिचा नवरा देहूला जायला तयार नव्हता. शेवटी त्याचा त्याग करुन बहिणाबाईने जायचे ठरविले. परंतु पती शिवाय पत्नी ही कल्पना बहिणाबाईला असह्य होवू लागली आणि त्याच वेळी गंगाधरच्या अंगाची आग होवू लागली. दाह काही केल्या थांबेना. पश्चातापाने गंगाधरने तुकारामाची मनोमन प्रार्थना केल्यामुळे दाह थांबला. शुद्राचे गुरुत्व मानले म्हणून गंगाधर व त्यांच्या कुटुंबियांचाही छळ मांडला. लोक राहयला जागा देई नात शेवटी देऊरवाड्याच्या ओसरीत सारेजण राहू लागले.

स्वप्नी जे देखिले ते तुकाराम तीला दिसले. तिचा आनंद गगनात मावेना झाला.

देऊळात कथा सर्व काळ होत |
श्रवण करीत दिनरात्री ||१||
तुकोबाची कथा वेदांतील अर्थ |
पावे माझे चित्त समाधान ||२||
तुकोबाचे ध्यान पूर्वी कोल्हापूर |
जे स्वप्नामाझारी देखियले ||३||
तेच ध्यान डोळा प्रत्यक्ष देखोनी |
आनंद लोचनी हेलावत ||४||
दिनरात्री निद्रा न ये तीळ भरी |
तुकाबो अंतरी प्रवेशला ||५||
बहेणी म्हणे येतो सुखाचे डोलावे |
जाणतो अनुभव जाणते जे ||६||

बहेणीचे देहभान हरपले, तिला कवित्व प्राप्त झाले
पाहो जो गेलिया मीच हारपलीये |
नवल कैसे झाले बाईयानो ||
बहेणी म्हणे नवल सांगा कोणापाशी |
माझे मी मानसी लाजियले ||

देहूच्या देऊळवाड्यात हा साक्षात्कार घडला. त्या पुन्हा शिऊरला आल्या. 'मुलगी काशी' व 'मुलगा विठोबा' यांच्या सोबत त्या शिऊरला राहिल्या. वयाच्या बहात्तराव्या वर्षी त्यांनी देह ठेवला.

तुकाराम महाराजांनी केलेला भागवतधर्माचा पुरस्कार आपल्या अभंगातून बहेणीबाईंनीही केला आहे.

आता धर्म यासी म्हणावे ब्राह्मण |
तरी ते अप्रमाण दिसतसे ||
ब्राह्मण ते भिन्न जाणते जाणती |
ज्ञानी ओळखती आत्मदृष्टी ||
अन्नदान द्रव्य गोदानादी सर्व |
बहूवर्णाभाव सारखाची ||

असा भेदाभेद अमंगळ मानणारा विचार बहिणाबाईंनी मांडला. त्याचबरोबर घरीची व्यथीही बहिणाबाईंनी मांडला.

वैदिक व्यवहार स्वामी उदरार्थ |
करीतसे तेथे देव कैसा ||१||
वेदपाठ काही नावडेची भक्ती |
पराधीन युक्ती न चले माझी ||२||
नामाचा विटाळ आमूचिये घरी |
गीताशास्त्र बैरी कुळी आम्ही ||३||
देव तीर्थयात्रा नावडती हरी |
ऐसीयाचे घरी संग दिला ||४||
संत समागम राघवाची भक्ती |
नावडती श्रुती शास्त्रगता ||५||
बहेणा म्हणे माझ्या पापाचा संग्रहो |
तुटोनिया राहो-चित्त शुध्द ||६||

तुकारामांनी नुसते वेद घोळणारे आणि अर्थाला विसलेले जे पढतमूर्ख त्यांचा धिक्कार केला, पण वेदांचा धिक्कार केला नाही. उलट वेदांचा अर्थ आम्हालाच अधिक आढळला आहे, असे सांगतले तसेच त्याची शिष्या वेदश्रध्द आहे, ती म्हणते

वेदासी विरुध्द | म्हणे आत्मज्ञानी |
पडला तो पतनी | गौरवाचे ||

म्हणून वेदनिंदकाचा तिने धिक्कार केला आहे. देवाशीही बहिणाबाई भांडते आणि त्यानंतरही तुझ्या चित्ती आमचेविषयी प्रेम असो, असा आग्रह धरणाऱ्या नामदेवाप्रमाणेच ती देवाला प्रार्थना करते -

मूर्खपणे तुम्हा छळीयेले भारी |

तरी तू श्रीहरी माय माझी |
लेकुरे बोलिले काय त्याचा खेद |
जननी आल्हाद मानी त्याचा |

संत बहिणाबाईंनी सातशेहून अधिक अभंग लिहिले आहेत. त्यांच्या अभंगातून त्यांचे जीवनचरित्राचा पट उलगडत जातो. तसेच त्यांचा अध्यात्म आणि भक्तीमार्गातील अधिकारही समजतो. गृहस्थाश्रमात राहुन कमलप्रमाणे राहिलेल्या बहिणाबाईंनी संताच्या कार्याचे सार सांगितलेला अभंग उद्गत केल्याशिवाय खरे कार्य समजणार नाही.

संत होती खरे भवार्णवी तारु |
जाणती उतारु प्राणियांचा ||१||
कासे लाविताती निष्ठाचिया बळे |
नेती ते कृपाळ पैलतीरा ||२||
नामाची सांगडी बांधीनी बळकट |
येणेपरी संत तारु खरे ||३||
बहेणी म्हणे मागे उतरिले बहुत |
येणेपरी संत तारु खरे ||४||

अशी संत बहिणाबाई किंवा बहेणीबाई यांनी इतर संत स्त्रियांप्रमाणे वाट न चोखाळता प्रपंच करत करत परमार्थ केला. 'स्त्री' असणे संतत्वाच्या आड कसे येते, तेही त्यांच्या आत्मचरित्रात येते. आत्यंतिक सामान्य आणि पारंपारिक वृत्तीच्या माणसाने घेरलेल्या या स्त्रीने अखेर योगसिध्द संतपदापर्यंत केलेला प्रवास पाहता ती खरी तुकारामशिष्या म्हणून शोभून दिसते. तुकारामाप्रमाणेच बहिणाबाईंचीही प्रपंचाने अखेरपर्यंत पाठराखण केली.

**संदर्भ ग्रंथ :-**

१) मध्ययुगीन भारतातील स्त्री-जीवन, लेखक - प्रा. डॉ. टी. टी. महाजन
२) अंतरीचा ठाव - मुरहरी केळे
३) http://www.globalmarathi.com

We the Research Organization will do provide help for the following works listed below.

*Support for Arts, Commerce & Science all Disciplines*

- Research Paper Publication
- Book Chapters for Publications
- ISBN Publications Supports
- M.Phil Dissertations Publish
- Ph.D. Thesis in Book Format
- ISSN Journals with Impact Factor
- Online Book Publication
- Seminar Special Issues
- Conference Proceedings

**Aadhar International Publication**

For Details Visit To : www.aadharsocial.com

**Mobile : 9595560278 /**

Aadhar PUBLICATIONS

For Details www.aadharsocial.com

New Hanuman Nagar, In Front Of

Pathyapustak Mandal, Behind V.M.V. College, Amravati ( M.S ) India Pin- 444604

, Mob-- 9595560278, Emial: aadharpublication@gmail.com **Price:Rs.500/**

ISSN 2278-9308